“आदिवासीतील गोंड जमातीचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

मानव विद्या शाखेतील मराठी विषयाच्या पीएच.डी. पदवी करिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

भारत माधव चांदेकर

एम.ए.(मराठी, राज्यशास्त्र) सेट (मराठी)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजू श्रावण मोतेराव

सरस्वती अध्यापक महाविद्यालय, किनवट

संशोधन केंद्र

भाषा वाड्मय व संस्कृती अभ्यास संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

अनुक्रमणिका

१) प्रस्तावना
२) संशोधन विषयाचा हेतू
३) विषय निवडीचे महत्त्व
४) संशोधनाची उद्दिष्टे
५) संशोधनाची गृहितके
६) संशोधन पद्धती
७) नमुना निवड
८) संशोधनाची साधने
९) पूर्व संशोधने
१०) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
११) प्रकरण योजना

“ आदिवासीतील गोंड जमातीचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास

१) प्रस्तावना -

आदिवासी समाजा विशिष्ट भूप्रदेशावर समूहाने एकत्र राहणारा असून हा अक्षर ओळख नसणारा समाज म्हणून ओळखला जातो. भारतात एकूण ४६१ आदिवासी जमाती असून त्यापैकी महाराष्ट्रात ४७ जमाती आहेत. त्यामध्ये गोंड, कोलाम, आंध, भिल्ल, परधान, पावरा, वारली, कातकरी, पारधी, माडिया गोंड इत्यादी जमाती असून कोलाम, कातकरी, माडिया गोंड या तीन जमातींना केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेले आहेत.

आदिवासी समाज हा निसर्ग सानिध्यात, दऱ्याखोरात, जंगलात, अतिदुर्गम भागात राहत असल्यामुळे भौतिक सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. बहुतांश आदिवासी हे अल्पभूधारक असून जंगलातील उत्पादनावर व प्राण्यांच्या शिकारीवर उदनिर्वाह करतात असे म्हटले जात असले तरी ते आज शिकारीवर अवलंबून नाहीत. संपूर्ण भारतात व महाराष्ट्रात आढळून येणारा हा समाज स्वतःला हिंदू धर्मीय म्हणून संबोधतो अनेक बाबतीत या समाजाचे हिंदू धर्माशी साम्य जरी असले तरी या समाजाचे निश्चित असे काही वेगळेपण आहे. उदा.- केशभूषा, वेशभूषा, रुढी, प्रथा, परंपरा, सण-उत्सव, साजरे करण्याची पद्धत व सर्वात महत्त्वाचे म्हणजे भाषा.आदिवासी समाजाला अति प्राचीन अशी संस्कृती लाभलेली आहे.

आज आदिवासी समुदाय या पृथ्वीतलावरील मानवीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. आज २१ व्या शतकात सुद्धा आदिवासींचा फार मोठा वर्ग दारिद्र्यात जीवन जगत आहे. आदिवासी समाज म्हणजे अति प्राचीन समाज किंवा अप्रगत व गौण समाज असे समीकरण करीत आहे, पण ते आज चुकीचे ठरत आहे. आज २१ व्या शतकातील ज्ञानाधिष्ठित समाजात शिक्षणामुळे

आमुलाग्र क्रांती झाल्याचे आपण पाहत आहोत. शिक्षणाच्या जोरावर भारताने अमेरिकेतील ‘सिलिकॉन व्हॅली' काबीज केली. परंतु शिक्षणाचा सूर्यच न पाहिलेली आदिवासी डोंगर, वन व दऱ्यात फिरतांना आजही दिसत आहे.

आदिवासी जमाती पैकी संख्येने सर्वात मोठ्या जमातीपैकी गोंड ही एक जमात होय. हे जरी गोंड नावाने ओळखले जात असले तरी ते स्वतःला कोई,कुई, कोईतुर म्हणतात. मानववंशशास्त्र व वंशशास्त्रीय दृष्टिकोनातून गोंड हे द्रविड वंशी असून साधर्म्य विदर्भात बोलल्या जाणाऱ्या गोंडी भाषेचे तामिळ व तेलगू भाषेची आढळते यात कन्नड शब्दही आढळतात. गोंडीही द्रविडियन भाषा त्यांची मातृभाषा आहे.

गोंड समाजात ‘गोटूल’ला महत्त्वाचे स्थान आहे पण आज ते लुप्त झालेले आहे. गोंड समाजात ५० पेक्षा जास्त उपगटात विभागणी केली गेली आहे. जसे राजगोंड, आरख, अराख, असुर, भाटोला, गामकी, गट्टा, गामता, गोवारी इत्यादी. यांच्यात चार देवे, पाच देवे, सहा देवे, सात देवे, बारा देवे अशी गोत्र आहेत. यावरून देवांची संख्या दिसते.

आदिवासी समाजातील गोंड जमातीची ओळख इतर समाजाला करून देण्याच्या दृष्टीनेच संशोधकांनी संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडलेला आहे.

२) संशोधन विषयाचा हेतू –

आदिवासी समाजाचा इतिहास हा शूरवीर व पराक्रमी महापुरुषांचा आहे. इतर समाजापासून हजारो वर्षे वेगळा राहून आपली संस्कृती, अस्मिता व अस्तित्व अबाधित ठेवलेला आहे. महाराष्ट्रात अनादी काळापासून दऱ्याखोऱ्यात, जंगलात, वनात, गावापासून विभक्त जीवन जगणाऱ्या समाजाची इतर समाजासारखी एक संस्कृती आहे. सण - उत्सव व विधी आहे. या सर्व परंपरा, संस्कृतीची ओळख मराठी भाषिकांना व्हावी व भारतीय समाजा अंतर्गत सांस्कृतिक, सामाजिक देवाण-घेवाण व्हावी या कारणासाठी संशोधकांनी संशोधन विषयाची निवड

केलेली आहे. आदिवासी समाजाचा विचार करीत असताना प्रत्येक आदिवासींची भाषा ही काही प्रमाणात वेगवेगळी आहे. गोंड ही आदिवासी जमात असून त्यांची भाषा व लोकसाहित्यात बऱ्याच प्रमाणात सारखेपणा व काही बाबतीत वेगळेपणा दिसून येतो. आदिवासी समाजाची ऐतिहासिक परंपरा व संस्कृती, रुढी, नीतिमूल्य, सामाजिक मूल्य, धार्मिक मूल्य व आर्थिक मूल्य हे आदिवासी गोंड जमातीत मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त झालेली आहेत. अशा आदिवासी गोंड जमातीचे लोकसाहित्याची ओळख भारतीय समाजाला व्हावी हा व्यापक दृष्टिकोन संशोधकांनी विषय निवडताना लक्षात घेतलेला आहे.

३) विषय निवडीचे महत्त्व –

"आदिवासीतील गोंड जमातीचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास या संशोधन समस्यांचा अभ्यास करीत असताना हीच समस्या अभ्यासासाठी निवडण्याचे महत्त्व काय ? हा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे ; म्हणून संशोधकांनी त्यांचे महत्त्व सांगण्याचे ठरविले असून त्यात गोंड जमातीच्या लोकसाहित्याची ओळख इतर समाजाला करून देणे, सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे, आदिवासी साहित्यातील वांङ्मयीन मूल्याची जोपासना करणे आणि आदिवासी गोंड जमातीच्या लोकसंस्कृतीची परंपरा टिकवून ठेवण्यासाठी प्रस्तुत विषयाचे महत्त्व आहे.

४) संशोधनाची उद्दिष्टे –

संशोधकांनी संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी आदिवासीतील गोंड जमातीचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास या विषयाची निवड केली असता संशोधनाची काही उद्दिष्टे ठरविलेली आहेत. आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्यात त्यांच्या लोक जीवनाचे व लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले आहे. लोकसाहित्य हे गोंड आदिवासी जमातीच्या समकालीन जीवनाचा व लोक संस्कृतचा वेध घेत असतात. म्हणूनच गोंड आदिवासींच्या लोकसाहित्यात

साकारलेल्या लोकजीवनाचा शोध घेणे हे या संशोधन विषयाचा विषयाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

1) आदिवासीतील गोंड जमातीच्या उत्पत्ती व विकासाचा शोध घेणे.
2) गोंड जमातीच्या लोकसाहित्याचा शोध घेणे.
3) गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करणे.
4) गोड जमातीच्या लोकसाहित्यातील बदलते प्रवाह अभ्यासणे.
5) गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे सद्यस्थितीतील महत्त्व स्पष्ट करणे.
6) गोंड जमातीच्या लोकसाहित्यातील भाषाशैली अभ्यासणे.
7) गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे आधुनिक काळातील उपयोजन स्पष्ट करणे.
8) गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे सद्यस्थितीतील लोक जीवनावरील परिणाम व सहसंबंध अभ्यासणे.

५) संशोधनाची गृहितके –

1) गोंड समाजाचे वेगळे लोकसाहित्य आहे.
2) गोंड जमातीतील लोकसाहित्याचे स्वतंत्र इतिहास आहे.
3) आधुनिक काळात सुद्धा गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे महत्त्व आहे.
4) गोंड जमातीचे लोकसाहित्य व संस्कृतीत विविधता आहे.
5) गोंड जमातीच्या लोकसाहित्यातुन सामाजिक जाणीवांचा विचार होतो.
6) गोंड समाजाचे लोकसाहित्य जीवन उपयुक्त आहे.
7) गोंड जमातीच्या लोकसाहित्यातील वेगळेपण अभ्यासण्यासारखे आहे.

६) संशोधनाची कार्यपद्धती –

साहित्य संशोधन हे जसे ग्रंथालयनिष्ठ असते तसेच सर्वेक्षणात्मकही असते. लोकसाहित्याचा अभ्यास करताना सर्वेक्षण करावे लागते. साहित्यसृष्टी ही अलौकिक रूपाची सृष्टी असते. तिला स्वतःचे वेगळे रूप असते. वाङ्मयाचा अभ्यास विविध दृष्टिकोनातून, विविध पातळीवरून आणि विविध वांड्मय प्रकार, विशिष्ट ग्रंथकार, विशिष्ट कालखंड, लोकसाहित्याचा अभ्यास आणि भाषिक अभ्यास.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी सर्वेक्षण पद्धतीची निवड केलेली आहे.

७) नमुना निवड –

संशोधनामध्ये नमुना निवड हे फार महत्त्वाचे असते. आपल्या दैनंदिन जीवनातही नमुना निवड करीत असतो. उदा. ‘भाताची परीक्षा शितावरून' असे म्हणतात. अगदी याच पद्धतीने लोकसाहित्याच्या अभ्यासातही नमुना पद्धतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत संशोधनात □आदिवासी गोंड जमातीचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास□ या विषयांचा अभ्यास करीत असताना संशोधनात वस्तुनिष्ठता यावी व संशोधन कार्य सत्याप्रत जावे यासाठी लोकसाहित्याच्या समग्राचा एक भाग म्हणून गोंड आदिवासी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. नांदेड व यवतमाळ जिल्ह्यात गोंड जमात संख्येने बऱ्यापैकी आहे. यातून गोंड समाज असलेल्या प्रमुख तालुक्याची निवड केली जाईल आणि जास्तीत जास्त लोकसाहित्य मिळविले जाईल या संशोधनात नमुना निवडताना सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

८) संशोधनाची साधने –

आदिवासी जमातीपैकी गोंड ही इतर आदिवासी जमातीपेक्षा वेगळी आणि पारंपरिक जमात होय. त्यांच्या संस्कृतीचा, भाषा आणि लोकसाहित्याचा अभ्यास व्हावा यासाठी प्रत्यक्ष भेटीतून,ग्रंथातून इतर माध्यमाद्वारे लोकसाहित्यात येणाऱ्या लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, लोक समजुती, लोकगीते संकलित करण्यात येणार असून ती साधने खालील प्रमाणे आहेत.

अ) मुलाखत

आ) ध्वनिमुद्रण

इ) ध्वनिफीत

ई) प्रकाशित ग्रंथ

उ) अप्रकाशित साहित्य

ऊ) इंटरनेट

अशाप्रकारे गोंड जमातीतील लोकसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी दृकश्राव्य साधनाचा वापर केला जाणार आहे.

९) पूर्व संशोधने –

संशोधकांनी संशोधनाचा अभ्यास करीत असताना प्रस्तुत विद्यापीठांतर्गत ज्या संशोधकांनी आदिवासी जमातीवर संशोधन केलेले आहेत त्यामध्ये प्रा. डॉ. राजू मोतेराव यांचे गोंडी आणि कोलामी लोकगीतांचा तौलणिक अभ्यास ,प्रा. डॉ. विद्यासागर सोनकांबळे यांनी 'किनवट तालुक्यातील गोंड जमातीचे सांस्कृतिक व ऐतिहासिक जीवन - एक अभ्यास यावर त्यांनी समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केलेला आहे.तर प्रा. डॉ.अंजली टारपे यांनी नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील गोंड लोकगीतांचा अभ्यास केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधक हा आदिवासीतील गोंड जमातीचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास करीत असताना नांदेड व यवतमाळ या ठिकाणी

असणाऱ्या गोंड समाजातील लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार, लोकसंस्कृती, लोककला, लोककथा व सामाजिक जीवन या अंगाने अभ्यास करणार आहे.

१०)संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -

कोणत्याही संशोधनाला मर्यादा पडतातच कारण संशोधकाला मिळणारा वेळ, पैसा व श्रम या सर्व बाबींचा त्यांच्या संशोधनावर परिणाम पडतो. आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास हा सांस्कृतिक श्रीमंतीची प्रचिती त्यांच्या लोकजीवनात सर्व प्रसंगी दिसून येते. गोंड समाजातील लोकजीवन, लोकगीते, सण-उत्सव, विवाह, लोककथा, लोककला, लोकगीते, लोक समजुती, म्हणी, वाक्प्रचार यांचा सूक्ष्म रीतीने अभ्यास करीत असताना गोंड ही जमात आपल्या वैशिष्ट्यासह अभ्यासण्याचा मानस ठेवला असून विविध भागांमध्ये गोंड समाज विखुरलेला आहे. गोंड समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक जीवन अभ्यासने शक्य होईल. गोंड समाजाचे अस्तित्व आहे हे समजून घेण्यासाठी गोंड समाजातील लोकसाहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधनाचा विषय हा आदिवासीतील गोंड जमातीचे लोक साहित्य या पुरताच मर्यादित असून, प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही गोंड जमाती पुरतीच मर्यादित आहे.

११)प्रकरण योजना –

प्रकरण पहिले – विषय प्रवेश

प्रकरण पहिले विषय प्रवेश यामध्ये संशोधन विषयाचा हेतू, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाची कार्यपद्धती, संशोधनाची साधने व तंत्रे, संबंधित विषयाची पूर्व संशोधने, संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - आदिवासी जमातीची ओळख

सदर प्रकरणांमध्ये महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची ओळख, यासोबतच गोंड जमातीचा इतिहास, गोंड जमातीची वैशिष्ट्ये, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील गोंड जमातीचे लोकजीवन यामध्ये समाज संघटन, देवदेवता, भाषा, विवाह पद्धती, व्यवसाय, सण उत्सव, गोंदवन, पोशाख, व्यवसाय, नातेसंबंध, व त्यांची वाद्य यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे – लोकसाहित्य म्हणजे काय ?

तिसऱ्या प्रकरणांमध्ये लोकसाहित्याची संकल्पना, लोकसाहित्य म्हणजे काय ?, लोकसाहित्याचे स्वरूप, लोकसाहित्याची वैशिष्ट्ये आणि लोकसाहित्याचे वर्गीकरण यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे – आदिवासीतील गोंड जमातीचे लोकसाहित्य

सदर प्रकरणांमध्ये आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्याची संकल्पना, गोड जमातीचे लोकसाहित्य म्हणजे काय ?, गोंड जमातीच्या लोकसाहित्य स्वरूप, आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्याची वैशिष्ट्ये आणि आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे वर्गीकरण यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे – आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे वेगळेपण

सदर प्रकरणांमध्ये आदिवासी गोंड जमातीच्या लोकसाहित्याचे वेगळेपण सांगत असताना इतर आदिवासी जमातीचे लोकसाहित्य आणि गोंड जमातीचे लोकसाहित्य यामध्ये असणारे वेगळेपण यांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहावे – उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संपूर्ण अभ्यासावरून उपसहार मांडण्यात येईल व त्या अनुषंगानेसंशोधनातुन मिळालेले निष्कर्ष नमूद करण्यात येतील.

- संदर्भ ग्रंथ सूची –

१) डॉ. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड प्रकाशन पुणे, प्रथम आवर्ती २००६
२) डॉ. देवगावकर शैलजा, महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, तिसरी आवृत्ती २०११
३) डॉ. गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, तृतीया वरती २०१२
४) डॉ. गारे गोविंद, आदिवासी लोकनृत्य (लय, ताल आणि सूर), कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००४
५) डॉ. देवगावकर एस जी., डॉ. देवगावकर शैलजा, गोंड, परधान आणि कोलाम, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २०११
६) डॉ. साळुंखे संजय, गोंड, संवेदन प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००२

संशोधक　　　　　　　　　　　　　　　　　　मार्गदर्शक